



दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : २८८
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, शुक्रवार, दि.३० मे २०२५


## थोडक्यात

### समाजपरिवर्तनासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवींचा आदर्श आत्मसात करावा : आ. सुधीर मुनगंटीवार

**अक्षराज : वसंत वडस्कर**



**दि.२९, चंद्रपूर :** पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या जीवनकार्यातून देशभक्ती, सेवा आणि त्याग यांची शिकवण घेत युवकांनी समाजपरिवर्तनासाठी त्यांचा आदर्श आत्मसात करावा, असे आवाहन राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांनी केले. राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जन्म महोत्सवानिमित्त भारतीय जनता युवा मोर्चा ग्रामीण व महानगर तसेच भाजपा युवा वॉरियर्सच्या वतीने चंद्रपूर येथील प्रियदर्शिनी इंदिरा गांधी सभागृहामध्ये आयोजित युवा संमेलनात ते बोलत होते. संमेलनात प्रमुख वक्ते म्हणून सुप्रसिद्ध वक्ते डॉ. सच्चिदानंद शेवडे यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी भाजपा जिल्हाध्यक्ष हरिश शर्मा, महानगराचे अध्यक्ष राहुल पावडे, भाजयुमो जिल्हाध्यक्ष महेश देवकते, महानगराचे अध्यक्ष विशाल निंबाळकर, डॉ. मंगेश गुलवाडे, सविता कांबळे, संध्या गुरनुले, राखी कंचर्लावार, आशिष देवतळे, अल्का आत्राम, रामपाल सिंग, सुरज पेदुलवार, किरण बुटले, अनिल डोंगरे, अमित गुंडावार, तनय देशकर, यश बांगडे, प्रवीण तायडे, गणेश रामगुंडावार, ओम पवार आदींची उपस्थिती होती. पुढे बोलताना आ. सुधीर मुनगंटीवार म्हणाले, ३१ मे १७२५ मध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवींचा जन्म झाला. अहिल्यादेवी होळकर यांनी न्यायप्रिय प्रशासन, धार्मिक स्थळांचे जीर्णोद्धार, आणि जनकल्याणकारी कार्ये यामुळे जनतेनी त्यांना 'पुण्यश्लोक' ही उपाधी दिली. अहिल्यादेवींनी राज्य जिंकण्यासाठी नव्हे तर रयतेचे मन जिंकण्याचे कार्य केले. इतर राज्यकर्ते भौगोलिक क्षेत्र जिंकण्यासाठी राज्य केले पण अहिल्यादेवींनी रयतेचे मन जिंकत राज्य केले. ३०० वर्षांपूर्वी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी समाजाच्या मनामनामध्ये जे रुजविण्याचा प्रयत्न केला, त्यांच्या तेजस्वी व्यक्तिमत्वातून विचारांचा तेज घेण्याचा सर्वांनी प्रयत्न करावा.

सुप्रसिद्ध वक्ते डॉ. सच्चिदानंद शेवडे यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे जीवनचरीत्र, त्यांचे राज्यकारभार, धर्मकार्य या सर्व बाबींवर आपल्या अनोख्या शैलीत प्रकाश टाकला.

### कल्याण चक्की नाका येथे वाहतूक सिग्नल बंद ठाकरे गटाकडून कडून तातडीच्या उपाययोजनेची मागणी



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२९, कल्याण (ठाणे) :** कल्याण पूर्वेतील प्रमुख वाहतूक केंद्र असलेल्या चक्की नाका येथे मागील काही काळापासून मुख्य वाहतूक सिग्नल बंद अवस्थेत आहे. यामुळे दररोज सकाळी आणि सायंकाळी प्रचंड वाहतूक कोंडी निर्माण होत असून, रस्त्यावरील प्रवास अतिशय त्रासदायक बनला आहे.

वाहतूक सिग्नल बंद असल्यामुळे वाहनचालक, पादचारी, शाळकरी मुले, ज्येष्ठ नागरिक आणि महिला यांना प्रचंड गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. रस्त्यावर शिस्त नसल्यामुळे अपघाताचे प्रमाण वाढण्याची शक्यता असून, स्थानिक नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे.

मोटार वाहन कायदा १९८८ च्या कलम १९ (फ) नुसार सार्वजनिक वाहतुकीचा सुरक्षित आणि सुरळीत प्रवाह राखणे आवश्यक आहे. या अनुषंगाने, चक्की नाका परिसरातील कल्याण ग्रामीण विधानसभा प्रमुख रोहिदास मुंडे यांनी वाहतूक विभागाकडे पुढील मागण्या केल्या आहेत:

१) वाहतूक सिग्नलची त्वरित दुरुस्ती करावी.
२) वााहतूक नियंत्रणासाठी पोलीस कर्मचारी तैनात करावेत.
३) वाहनचालकांसाठी सूचना फलक (साइनबोर्ड्स) लावण्यात यावेत.

या परिस्थितीकडे वाहतूक विभागाने गांभीर्याने पाहून, नागरिकांच्या सुरक्षिततेस प्राधान्य देत तातडीने आवश्यक पावले उचलावीत, अशी सर्व नागरिक, स्थानिक व्यापारी, शाळा व्यवस्थापन आणि सामाजिक संस्थांची कळकळीची मागणी आहे.

जर वेळेत कार्यवाही झाली नाही, तर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून पुढील आंदोलनात्मक भूमिका घेतली जाऊ शकते, असा इशाराही कल्याण ग्रामीण विधानसभा प्रमुख रोहिदास मुंडे यांनी दिला आहे. यावेळी निवेदन देताना जिल्हा संघटक तात्यासाहेब माने,उप जिल्हाप्रमुख राहुल भगत, सदाशिव गायकर, विधानसभा संघटक विजय भोईर, तालुकाप्रमुख भगवान शांताराम पाटील, तालुका संघटक, भालचंद्र म्हात्रे, उप तालुकाप्रमुख, परेश पाटील, मुकेश नाना भोईर, किरण पाटील, धनंजय गायकर युवा सेना, विभागप्रमुख नागेश पवार आदी उपस्थित होते.

## मोठी बातमी ! आषाढी एकादशीला 'या' वाहनांना टोलमाफी !!

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२९, मुंबई :** आषाढी वारीनिमित्त वारीत सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांना संरक्षण देण्यासाठी त्यांचा समूह विमा काढण्यात येईल, तसेच त्यांना दरवर्षीप्रमाणे यावर्षीही वैद्यकीय सेवा पुरवण्यात येतील असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केले. आषाढी वारीनिमित्त केलेल्या उपाययोजना आणि वारकऱ्यांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांचा आढावा घेण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली काल सह्याद्री अतिथीगृहात विशेष बैठक पार पडली होती. त्याविषयीची अधिक माहिती प्रसार माध्यमांना आज देतांना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे बोलत होते.




नुकत्याच झालेल्या मुसळधार पावसामुळे वारी मार्ग कुठेही खराब झाला असल्यास मुरूम, खडी आणि डांबरीकरण करून त्याची तातडीने डागडुजी करावी, वारकऱ्यांना मुबलक पाणी, विजेची जोडणी, पालखी तळावर वॉटरप्रूफ तंबू उपलब्ध करून घ्यावे तसेच वारीसाठी जाणाऱ्या गाड्यांना दरवर्षीप्रमाणे टोल मध्ये सवलत दिली जाईल असेही उपमुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. गतवर्षीप्रमाणे याहीवर्षी आषाढी वारीनिमित्त राज्याच्या आरोग्य विभागाकडून भव्य आरोग्य शिबिरे आयोजित केली जातील, वारकऱ्यांसाठी कार्डीएक रुग्णवाहिकेची सोय उपलब्ध करून दिली जाईल, पंढरपुरात तात्पुरती आयसीयू सुविधा उपलब्ध करून दिली जाईल, या सर्व सोयी उपलब्ध करून देण्यासाठी आरोग्य मंत्री प्रकाश अबिटकर यांनी स्वतः पंढरपूरला जाऊन आढावा घ्यावा असे निर्देश शिंदे यांनी यावेळी त्याना दिले. तसेच प्रत्येक जिल्ह्यातून निघणाऱ्या मोठ्या दिड्यांना वारीच्या काळात पूर्णवेळ सुसज्ज रुग्णवाहिका उपलब्ध करून द्यावी असेही उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले.

**नोडल अधिकारी नेमणार**

यासोबतच गतवर्षी वारीदरम्यान झालेल्या अपघातात मृत्युमुखी पडलेल्या वारकऱ्यांना शासनाद्वारे मदत केली जाईल, पोलिसांशी व्यवस्थित समन्वय व्हावा यासाठी नोडल ऑफिसर नेमण्यात येईल.

वारकऱ्यांचे भोजन आणि इतर प्रथा परंपरा वेळच्या वेळी पार पाडाव्यात यासाठी वारी कुठे जास्त वेळ खोळंबणार नाही यासाठी प्रयत्न केला जाईल, यंदाची वारीही स्वच्छ वारी, निर्मल वारी हरित वारी म्हणून आपल्याला पार पाडायची असल्याने त्यासाठी लागेल ते सर्व सहकार्य शासनाकडून केले जाईल असेही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

## अभिनेते अशोक सराफ यांच्यासह महाराष्ट्रातील ६ मान्यवर पद्म पुरस्काराने सन्मानित

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२९, ठाणे :** विविध क्षेत्रांमध्ये अतुलनीय काम करणाऱ्या ६८ मान्यवरांना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते देशातील सर्वोच्च नागरी पुरस्कार असणाऱ्या 'पद्म पुरस्कारां' ने सन्मानित करण्यात आले. यात महाराष्ट्रातील सहा मान्यवरांचा समावेश आहे.

राष्ट्रपती भवनात आयोजित समारंभात राष्ट्रपती यांच्या हस्ते दुसऱ्या व अंतिम टप्प्यात पद्म पुरस्कार प्रदान करण्यात आले. या कार्यक्रमात उपराष्ट्रपती जगदीप धनखड, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी,



केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, तसेच अन्य केंद्रीय मंत्रीगण व केंद्र शासनातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

या पुरस्कार समारंभात राज्यातील सहा मान्यवरांना राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आले. यामध्ये राज्याचे माजी मुख्यमंत्री व माजी लोकसभा अध्यक्ष डॉ. मनोहर जोशी यांना सार्वजनिक क्षेत्रातील योगदानासाठी 'पद्मभूषण पुरस्कार' (मरणोत्तर) तर अशोक सराफ, अच्युत पालव, अश्विनी भिडे- देशपांडे यांना कला क्षेत्रातील अमूल्य योगदानासाठी तसेच कृषी क्षेत्रातील भरीव कामगिरीसाठी सुभाष शर्मा व वैद्यकीय क्षेत्रातील उत्तम कार्यासाठी डॉ. विलास डांगरे यांना पद्मश्री पुरस्काराने राष्ट्रपती यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

## पिकांचे व नुकसानग्रस्त घरांचे तात्काळ पंचनामे करा : आ.काशिनाथ दाते

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२९, पारनेर (अहिल्यानगर) :** नगर तालुक्यातील खडकी, अकोळनेर, सारोळा कासार येथे काल मंगळवारी (दि.२७) रोजी दुपारी २ च्या सुमारास अतिवृष्टी झाल्यामुळे या गावांमध्ये मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

काल मंगळवारी रोजी दुपारी झालेल्या अतिवृष्टीमुळे या गावांमध्ये पुर परिस्थिती निर्माण झाल्याने शेतकऱ्यांच्या शेतात व घरामध्ये पाणी गेले आहे शेत जमीन व शेती पिके वाहून गेल्यांने मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून

घरांचे लहान मोठ्या स्वरूपात नुकसान झाले आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांशी आमदार काशिनाथ दाते सर यांनी संवाद साधत व्यथा जाणून घेऊन आम्ही सर्व तुमच्या सोबत आहे असा धीर शेतकऱ्यांना देत नुकसानग्रस्त भागाची पाहणी करून पंचनामे करावेत असे आदेश आमदार कशिनाथ दाते सर यांनी नगर तालुका तहसीलदार संजय शिंदे यांना दिले आहेत.

अतिवृष्टीमुळे खडकी, अकोळनेर, सारोळा कासार परिसरात शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात कांदे पिकाचे प्रचंड नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी घरांची पडझड झाली जनावरे, शेळया, मेंढ्या, गोठा, पत्रे पुराच्या पाण्यामध्ये वाहून गेले आहे गावातील रस्ते, पुल, बंधारे वाहून गेले आहेत तर वीज वितरण व्यवस्थेचे देखील मोठे नुकसान झाले. अनेकांच्या घराचे पत्रे उडून संसार उघड्यावर आले आहेत. खडकी परिसरात झाडे उन्मळून पडली कांदा, टॉमॅटो, बिजली, झेंडु यासह इतर पिकांचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे विजेचे पोल पडून वीजपुरवठा खंडित झाला असून खडकी परिसरात १५ हुन अधिक विजेचे पोल पडले आहेत.



> खडकी, अकोळनेर, सारोळा कासार या गावांमध्ये अतिवृष्टीमुळे ओढ्या नाल्यांचे पाणी घुसून अथवा पाणी साठून ज्या पिकांचे अथवा शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. तेथे तहसीलदारांनी खात्री करून पंचनामे करावेत अशा सूचना केलेल्या आहेत. आहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्या मार्गदर्शनाखाली नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना लवकरात लवकर मदत मिळवी यासाठी शासन स्तरावर प्रयत्न करणार आहे.
>
> **- आमदार, काशिनाथ दाते**

## दुचाकी मोटार सायकल चोरी करणाऱ्या एका आरोपीला अटक

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२९, चंद्रपूर :** स्थानिक गुन्हे शाखेने दुचाकी चोरट्यास अटक करीत त्याच्या कडून १ लाख ७० हजार रुपये किमतीच्या ४ दुचाकी जप्त केले आहे. राकेश अमर वाळके (२६) रा. बाबुपेठ वार्ड चंद्रपुर असे आरोपीचे नाव आहे. २६ मे २०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखा चंद्रपूर येथील पथकाने मिळालेल्या गोपनिय माहितीवरुन राकेश अमर वाळके (२६) वर्ष रा. बाबुपेठ वार्ड चंद्रपुर यास ताब्यात घेऊन त्याचे ताब्यातील विविध पोलीस स्टेशन मधील चोरीस गेलेले ४ दुचाकी वाहने जप्त केले. त्यात पोलीस स्टेशन बल्लारपूर कलम ३०३ (२) बीएनएस मधील हिरो पॅशन प्रो मोटार सायकल क्रं. एम एच ३४



एआर ०४५२, पोलीस स्टेशन भद्रावती अपराध क्रमांक २४८/२०२५ कलम ३०३ (२) मधील हिरो एप्लेंडर मोटार सायकल क्रं. एमएच ३६ आर ४०६८, पोलीस स्टेशन रामनगर अपराध क्रमांक ४६९/२०२५ कलम ३०३ (२) मधील हिरो स्प्लॅन्डर मोटार सायकल क्रं. एम एच ३४ एक्स ३७५२, होन्डा ॲक्टीवा क्रं. एमएच ३४ सीबी ४९८४ असे एकुण १ लाख ७० हजार रुपयाचा माल जप्त करण्यात आले आहे. गुन्हयाचा पुढील तपास बल्लारपूर पोलीस करीत आहेत.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक रिना जनबंधु यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अमोल काचोरे यांचे नेतृत्वात सहायक पोलीस निरीक्षक बलराम झाडोकर, पोलीस उपनिरीक्षक संतोष निंभोरकर, पोहवा जयसिंग, गणेश मोहुर्ले, दिनेश अराडे, नापोअं संतोष येलपुलवार, पोअं नितीन रायपुरे, मिलींद जांभुळे सर्व स्थानिक गुन्हे शाखा चंद्रपूर यांनी केली आहे.

# संपादकीय



## पुनरुज्जीवनाच्या वाटेवर केजरीवाल

एखाद्या राजकीय पक्षाचा जन्म होताच विधानसभेत थेट सत्ताप्राप्ती, नंतर सलग १२ वर्षे टिकवेलली सत्ता, असा भाग्ययोग अनुभवणारे राजधानीतले एकमेव नेते म्हणजे आम आदमी पक्षाचे (आप) सर्वेसर्वा अरविंद केजरीवाल. अलीकडे पंजाबसारख्या राज्यातही सत्ताप्राप्ती केलेल्या 'आप'च्या या राजकीय वाटचालीत 'अंत उन्नतीचा पतनी,' असा दिल्लीत तरी अनुभव यंदाच घेणारे केजरीवाल यांनी आपल्या डावपेचांत लक्षणीय बदल करून 'आप'च्या विद्यार्थी संघटनेचे नुकतेच पुन्हा बारसे केले. तरुण मतदारांना आकर्षित करण्यासाठी आणि प्रतिमासंवर्धनासाठी केजरीवाल यांनी पक्षाच्या 'सीवायएसएस' या जुन्या विद्यार्थी संघटनेचेच पुनरुज्जीवन करून 'असोसिएशन ऑफ स्टुडंट्स फॉर अल्टरनेटिव्ह पॉलिटिक्स' (एएसएपी-आस्प) ही नवी विद्यार्थी संघटना सुरू केली. केजरीवालांसह 'आप'च्या बहुतेक सर्व वरिष्ठ पक्षनेत्यांवरील भ्रष्टाचाराचे आरोप आणि सत्ता गेल्यावर स्वाभविकपणे पडलेला संसाधनांचा दुष्काळ यांसारख्या आव्हानांना तोंड द्यावे लागणारे केजरीवाल यांच्या नेतृत्वक्षमतेचीही सध्या अग्निपरीक्षा सुरू आहे. केजरीवाल यांच्या उक्तीतील ताजा बदल दिल्लीतील पराभवानंतर 'आप'ची पुनर्बांधणी आणि राष्ट्रीय विस्ताराच्या धोरणाचे प्रतिबिंब मानले पाहिजे.

केंद्रीय तपास यंत्रणांनी केजरीवाल, माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया व सत्येंद्र जैन आदींना दारू घोटाळा भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली गजाआड केल्याच्या पार्श्वभूमीवरील यंदाच्या दिल्ली विधानसभा निवडणुकीत भाजपकडून 'आप'चा पराभव झाला; पण दिल्लीकरांनी भाजपला 'आप'इतके पाशवी बहुमत दिलेले नाही. नंतर 'आप'ने दिल्ली महापालिकेच्या (एम सीडी) निवडणुकांपासूनही स्वतःला दूर केले. पराभवानंतर अदृश्यावस्थेत गेलेले केजरीवाल यांनी मागच्या मंगळवारी प्रकट होऊन निवडणूक निकालानंतर दिल्लीत पहिली जाहीर सभा घेतली, ती या विद्यार्थी संघटनेच्या निमित्ताने.

सन २०१०-११ मधील जनलोकपाल आंदोलनानंतर 'आप'ची स्थापना व अरविंद केजरीवाल हे भारतीय राजकारणात, त्यातही मध्यमवर्गाचे एक आशेचे किरण बनले होते. विशेषतः भारतीय मध्यमवर्गाला आणीबाणीनंतर प्रथमच प्रस्थापित सत्ताधाऱ्यांच्या राजकारणापेक्षा एक वेगळा, नवचैतन्य आणणारा, किमान बोलण्यात प्रामाणिकपणा जाणवतो, असा पर्याय केजरीवालांच्या रुपाने दिसला होता; पण २०१३मधील पहिल्या सत्ताप्राप्तीनंतर त्यांचा अहंकार वाढला, तो वाढतच गेला. सन २०२०मध्ये सलग तिसऱ्यांदा सत्ता आल्यावर 'आप'च्या माध्यमातून निर्माण केलेल्या या आशावादाचे रूपांतर हळूहळू निराशावादात होत गेले. 'निळ्या वॅगनआर' पासून केजरीवालांची हा पर्यायी राजकारणाचा सुरू झालेला प्रवास 'शीशमहाला'पर्यंत पोहोचला. यंदाच्या प्रचारात राहुल गांधी, भाजपने याच्यावर रान उठवलं ते अगदी स्वाभाविक. अण्णा हजारे यांच्या जंतरमंतरपासून रामलीला मैदानावरच्या आंदोलनापर्यंत केजरीवालांना पडद्याआडून कथितपणे रसद पुरवणाऱ्यांना नंतर केजरीवालांची गरज भासेनाशी झाली.

अलीकडेच एकमेव तृतीयपंथी नगरसेवक बॉबी किन्नर यांच्यासह 'आप'च्या १३ ते १५ नगरसेवकांनी त्यांना टाटा करून स्वतःचा 'इंद्रप्रस्थ विकास पक्ष' स्थापन केला आणि विधानसभा व महापौरपद गमावल्यानंतर केजरीवालांना याच महापालिकेत आणखी एक दणका बसला. राजकारण्यांजवळ खऱ्या प्रश्नांची उत्तरे नसतात, तेव्हा काही तरी नव्या सबबीची गरज असते. केजरीवाल व 'आप' यांना २०१३ नंतर 'एएसएपी'च्या रुपाने विद्यार्थ्यांसाठी पर्यायी राजकारण हवे, ह्य सद्विचार आठवणे हा प्रकारही केजरीवाल यांच्याबाबत तसाच निघणार नाही हे कशावरून, हा दिल्लीकरांच्या मनातील सवाल आहे. त्यामुळेच 'एएसएपी' नावाच्या नव्या पॅकेजिंगनंतरही केजरीवाल यांना गंभीरपणे काही तरी करणे भाग पडल्याचे स्पष्ट आहे.

# चीन भारताचा क्रमांक एकचा शत्रू

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

भारताचा क्रमांक एकचा शत्रू पाकिस्तान नसून चीन आहे आणि भारताला खरा धोका चीनपासूनच आहे असे विधान १९९८ साली भारताचे तत्कालिन संरक्षणमंत्री जॉर्ज फर्नांडिस यांनी केले होते. जॉर्ज फर्नांडिस हे अटलबिहारी वाजपेयी यांच्या मंत्रिमंडळात संरक्षणमंत्री होते. २८ वर्षापूर्वी जॉर्ज फर्नांडिस यांनी केलेल्या विधानावर आज अमेरिकन सुरक्षा गुप्तचर यंत्रणेने शिक्कामोर्तब केले आहे. या यंत्रणेने नुकताच एक अहवाल प्रसिद्ध केला. या अहवालात त्यांनी नमूद केले आहे की भारताचा मुख्य शत्रू हा पाकिस्तान नसून चीन आहे आणि भारताला खरा धोका चीनपासूनच आहे. भारताने चीनशी सावध वागावे. अमेरिकन सुरक्षा गुप्तचर यंत्रणेच्या या अहवालावर जाणकार लोकांना आश्चर्य वाटणार नाही कारण आंतरराष्ट्रीय आणि सुरक्षा विषयक जाणकार देखील नेहमी हेच सांगत आले आहे की आपला मुख्य शत्रू चीन आहे अर्थात पाकिस्तान आपला शत्रू आहे यात वाद नाही. १९४८, १९६५, १९७१, १९९९ साली आपण पाकिस्तानशी युद्ध केले आणि पाकिस्तानला पाणी पाजले आताही सिंदूर ऑपरेशन मध्ये आपण त्याचीच पुनरावृत्ती केली. पाकिस्तान आपला शत्रू असला तरी प्रत्यक्ष लढाईत पाकिस्तान भारतासमोर टिकू शकत नाही हे अनेकदा सिद्ध झाले आहे. असे असले तरी पाकिस्तान दरवेळी आपली कुरापत काढतो कारण त्यांच्यामागे चीन आहे. आताही पहलगाम हल्ल्याचा संपूर्ण जगाने निषेध केला तरी चीनने त्यावर अवाक्षर ही काढले नाही इतकेच नाही तर त्यानंतर झालेल्या लढाईतही चीनने पाकिस्तानलाच पाठिंबा दिला आणि पाकिस्तानच्या पाठीशी चीन खंबीरपणे उभा असल्याचीग्वाही दिली. आता अमेरिकन सुरक्षा गुप्तहेर संघटनेने दिलेल्या अहवालावर भारताने कोणतीही प्रतिक्रिया दिली नसली तरी भारत हा अहवाल गांभीर्याने घेणार यात वाद नाही. कारण चीन हा किती विश्वासघातकी देश आहे याचा अनुभव आपण १९६२ साली त्यानंतर वेळोवेळी घेतला आहे. आताही चीन अधूनमधून भारताच्या कुरापती काढतच असतो. भारताचा सख्खा शेजारी असणारा पण भारताला कायम पाण्यात पाहणारा चीन सतत काही ना काही खोड्या काढून दोन्ही देशातील तणाव वाढवत असतो. हे आताच नाही तर १९६२ पासून चालू आहे. १९६२ साली भारताशी मैत्रीचा हात पुढे करून हिंदी चिनी भाई भाई म्हणत त्याने भारताचा केसाने गळा कापला. त्यानंतरही त्याने भारताच्या सतत खोड्या काढून भारताला त्रास दिला. कधी त्याने भारतात घुसखोरी केली तर कधी त्याने सीमेवर नवीन गावे वसवली तर कधी भारतातील गावांना चिनी नावे देऊन ती गावे चीनच्या हद्दीत असल्याचा दावा केला अर्थात चीनच्या या दाव्याला किंवा खोडसाळपणाला भारताने कधी भीक घातली नाही तरीही त्यांचा खोडसाळपणा कमी झाला नाही उलट वाढतच गेला. दोन वर्षापूर्वी चीनने भारतातील लडाख आणि अरुणाचल प्रदेशातील काही गावांना



चीनच्या नकाशात दाखवले होते. इतकेच नाही तर त्या गावांना चिनी नावे देखील दिली होती. चीनच्या या खोडसाळपणाची भारताने तातडीने दखल घेऊन त्याचा निषेध केला होता. भारताच्या निषेधानंतरही चीनने भारताच्या खोड्या काढणे बंद केले नाही. मागील वर्षी चीनने भारताच्या लडाखमध्ये दोन नव्या काऊंट्याची घोषणा करत घुसखोरी केली. भारताच्या हे लक्षात आले भारतीय लष्कराने आणि परराष्ट्र मंत्रालयाने याचा चीनला जाब विचारला. चीन एवढ्या वरच थांबला नसून चीनने भारताशी वॉटर वार सुध्दा सुरू केले असून चीनने ब्रह्मपुत्रा नदीवर मोठा जल प्रकल्प सुरू केला आहे या जल प्रकल्पामुळे भारताला भविष्यात मोठ्या जल संकटाला सामोरे जावे लागणार आहे . दुसऱ्यांच्या खोड्या काढून गंमत पाहण्याची चीनची जुनी खोड आहे. अशी खोड तो फक्त भारताचीच काढतो असे नाही तर इतर देशांचीही काढतो मात्र आशिया खंडातील विशेषतः भारताच्या शेजारील काही देशांना त्याने वारेमाप कर्ज देऊन तर काही देशांना धाक दाखवून त्याने गप्प बसवले आहे. भारत मात्र त्याच्या या खेळीला बळी पडत नाही म्हणूनच तो अशा खोड्या अधून मधून काढत असतो. भारताच्या अरुणाचल प्रदेश आणि लडाखवर चीनचा डोळा आहे इतकेच नाही तर अरुणाचल प्रदेश हा आपलाच भूभाग असल्याचा दावा चीनने अनेकदा केला आहे. चीनच्या झाऊझंग येथे पार पडलेल्या क्रीडा स्पर्धेत भारताने खेळण्यास नकार दिला त्यावेळी चीनने अरुणाचल प्रदेशातील खेळाडूंना स्टेपल व्हिसा दिला होता. स्टेपल व्हिसा देऊन त्यांनी एकप्रकारे भारताला डिवचले होते. त्या आधी लडाखमध्ये चिनी सैन्य घुसवले होते तेंव्हा दोन्ही देशातील सैन्य एकमेकांपुढे उभे ठाकले होते केंव्हाही युद्धास तोंड फुटेल अशी परिस्थिती निर्माण झाली होती. त्यावेळी झालेल्या धुमश्चक्री नंतर चिनी सैन्य भारताच्या हद्दीतून निघून गेले होते. मात्र सीमेवर त्यांच्या हालचाली कायम चालू असतात. मुळात चीन हा जगातला सर्वात कपटी देश आहे. चीनला जगातील महासत्ता व्हायचं आहे त्यासाठी त्याने विस्तारवादी भूमिका स्वीकारली आहे त्यामुळेच तो शेजारील देशांची जमीन आणि मालमत्ता बळकावीत आहे. त्यांच्या या विस्तारवादी धोरणाला जर कोणी आडकाठी आणणार असेल तर तो भारत आहे हे चीन जाणून आहे म्हणूनच तो भारताच्या अधूनमधून खोड्या काढून भारताला त्रास देत असतो अर्थात त्याच्या या खोड्यांना भारत आता बधणार नाही कारण आजचा भारत हा १९६२ चा भारत नसून २०२५ चा भारत आहे. जरी चीनचे लष्करी सामर्थ्य भारतापेक्षा अधिक असले तरी चीनच्या आरे ला कारे करण्याची हिंमत या भारतात आहे.

# 'शुभ'मन पर्वास सुरुवात

भारतीय क्रिकेट संघ पुढील महिन्यात इंग्लंडच्या दौऱ्यावर जाणार आहे. २० जून पासून सुरू होणाऱ्या या दौऱ्यात भारतीय क्रिकेट संघ ५ कसोटी सामन्यांची मालिका खेळणार आहे. या दौऱ्यापूर्वी भारताचे आधारस्तंभ असलेले अनुभवी रविचंद्रन अश्विन, रोहित शर्मा आणि विराट कोहली या तिघांनी कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती स्वीकारली. भारताचे आधारस्तंभ असलेल्या या त्रिमूर्तीने जवळपास दीड दशके भारतीय क्रिकेटची धुरा वाहिली त्यामुळे या तिघांच्या निवृत्तीनंतर पहिल्यांदाच भारतीय क्रिकेट संघ कसोटी मालिका खेळतोय ते ही इंग्लंड सारख्या बलाढ्य संघाविरुद्ध आणि ते ही त्यांच्याच देशात त्यामुळे या दौऱ्यात भारतीय संघात कोणते खेळाडू असतील ? संघाचा कर्णधार कोण असेल? अश्विन, रोहित आणि विराट या तिघांची जगा कोण भरून काढणार ? असे अनेक प्रश्न क्रिकेट चाहत्यांना पडले होते. या प्रश्नाचे उत्तर निवड समितीने नुकतेच दिले. निवड समितीचे अध्यक्ष अजित आगरकर यांनी इंग्लंड दौऱ्यासाठी १८ सदस्यीय भारतीय संघाची घोषणा केली. हे करताना त्यांनी नव्या कर्णधाराचीही घोषणा केली. भारतीय कसोटी संघाचा नवा कर्णधार म्हणून युवा फलंदाज शुभमन गिलची निवड केली. युवा शुभमन गिल हाच भारताच्या कसोटी संघाचा नवा कर्णधार असेल अशी अपेक्षा होती आणि ती खरी ठरली. मी माझ्या ' भारतीय कसोटी संघाचा संक्रमणकाळ' या लेखात तसे भाकीत वर्तवले होते ते खरे ठरले. शुभमन गिलच्या गळ्यात कर्णधारपदाची माळ टाकून निवड समितीने त्याच्यावर मोठा विश्वास टाकला आहे अर्थात या विश्वासाला तो पात्र ठरेल का ? याचे उत्तर आगामी काळात मिळेलच मात्र त्याच्यावर ही कामगिरी सोपवून निवड समितीने सकारात्मक पाऊल टाकले आहे हे मान्यच करावे लागेल. शुभमन गिल आता २५ वर्षाचा आहे. अवघ्या २५ व्या वर्षी कर्णधारपदाची माळ गाळ्यात पडलेला शुभमन गिल हा पहिला खेळाडू नाही या आधी पतौडी, सचिन तेंडुलकर आणि रवी शास्त्री यांनी २५ व्या वर्षी किंवा त्याआधीच कर्णधारपद भूषवले आहे. सचिनकडे तर अवघ्या २१ व्या वर्षीच ही जबाबदारी आली होती. शुभमन गिलने मागील सात वर्षात जी कामगिरी केली त्या आधारेच त्याला भारतीय संघाचे कर्णधारपद मिळाले आहे. मागील सात वर्षातील त्याची कामगिरी चांगलीच नाही तर अविश्वसनियन अशी आहे. या सात वर्षात त्याने फलंदाज म्हणून तर छाप पाडलीच आहे पण कर्णधार म्हणूनही त्याने स्वतःला सिद्ध केले आहे. २०१८ मध्ये त्याच्या नेतृत्वाखाली १९ वर्षाखालील भारतीय संघाने विश्वविजेतेपदाला गवसणी घातली होती. या संघाचे नेतृत्व ज्याप्रकारे केले होते ते पाहून तेंव्हाच काही जाणकारांनी तो भविष्यात भारताच्या मुख्य संघाचा कर्णधार असेल असे भाकीत केले होते. ते भाकीत आज खरे ठरले. केवळ १९ वर्षाखालील संघाचीच नव्हे तर आयपीएलमध्ये गुजरात टायटन्स या संघाचे नेतृत्व केले ते पाहता तो भारतीय संघाचे नेतृत्व करण्यास पात्र असल्याचे सिद्ध झाले. सध्या चालू असलेल्या आयपीएलमध्ये त्याने त्याच्या कुशल नेतृत्वाने गुजरात संघाला प्ले ऑफ मध्ये प्रवेश मिळवून दिला. या दरम्यान त्याने फलंदाजीतही चमक दाखवत ६०० च्या वर धावा काढल्या. याच कामगिरीच्या जोरावर त्याला भारतीय कसोटी संघाचे कर्णधारपद मिळाले असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. आता २० जूनला तो पहिल्यांदा भारतीय संघाचा कर्णधार म्हणून मैदानात उतरेल त्या क्षणापासून भारतीय क्रिकेटमध्ये! ' शुभ' मन पर्व सुरू होईल. शुभमन गिलची भारतीय संघाच्या कर्णधारपदी निवड झाली असली तरी त्याच्यासाठी हे पद सांभाळणे सोपे नाही. भारतीय संघाचा कर्णधारपदाचा मुकुट हा काटेरी असतो. तो मुकुट धारण करणे म्हणजे साक्षात निखाऱ्यावरून चालण्यासारखे आहे त्यात शुभमन गिलला जो संघ दिला आहे तो नवखा आहे. या संघात अनेक नव्या खेळाडूंचा समावेश आहे. यातील बहुतेक खेळाडूंना इंग्लंडमध्ये खेळण्याचा अनुभव नाही. बुमरा, पंत आणि के एल राहुल याच खेळाडूंना इंग्लंडमध्ये खेळण्याचा अनुभव आहे त्यामुळे या नव्या खेळाडूंना घेऊन इंग्लंड सारख्या खडतर दौऱ्यावर जाऊन तिथे जिंकणे हे मोठ्या जिकिरीचे काम शुभमनला करावे लागणार आहे. अर्थात या संघाकडे गमावण्यासारखे काही नाही मात्र कमावण्यासाठी खूप काही आहे. शुभमन गिलने जर या नवख्या खेळाडूंकडून त्यांच्यातील सर्वोत्तम खेळ करून घेतला आणि आपल्या कुशल नेतृत्वाने भारतीय संघाला विजय मिळवून दिला तर मोठा इतिहास घडेल. अर्थात इतिहास घडवण्याची क्षमता या संघात आणि नव्या कर्णधारात आहे यात शंका नाही. भारतीय संघास आणि भारतीय संघाचा नवा कर्णधार असलेल्या शुभमन गिल यांस खूप खूप शुभेच्छा!

**- श्याम ठाणेदार -**
**दौंड जिल्हा पुणे ९९२२५४६२९५**

### कचरा..

नाले तुडुंबले तुंबले
भरगच्च भरे कचरा
यक्ष प्रश्न सतावितो
कसा करता निचरा

ओला सुखा वेगळा
कायदा वाटे बोचरा
घंटा गाडी घंटानाद
स्वतांसप्रश्न विचारा

कर्तव्य काय जाणा
मगचं दाखवा तोरा
पकडून द्यावे आधी
मनांतलपल्या चोरा

आवरावे अन्यकुणी
स्वताचं करी पसारा
दोष देतोयं यंत्रणेला
नाचे फुलवू पिसारा

वेळेवर नाले सफाई
तोडतो अक्कलतारा
सल्लेदेणार फुकटचे
या नशेला नसेउतारा

बहकलेला नागरिक
गुन्हेगारअसतो खरा
झाडूला माना लक्ष्मी
सोडा अहंकारनखरा

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६.**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

# वाचक पत्र




## सोशल मीडियातील धोक्यांपासून तरुणाईला सावध करावे !

२६ मे ला भारतीय जनता पार्टीने एक्स वर एक व्हिडीओ प्रसारित केला ज्यामध्ये फेसबुकच्या माध्यमातून बंगालमधील ९० हजार मुलींचे अपहरण करण्यात आल्याची माहिती बंगाल पोलिसांनी दिल्याचे उघड झाले आहे. आजमितीला प्रत्येकाच्या हातात मोबाईल आहे आणि त्यामध्ये मुबलक प्रमाणात मोबाईल डाटाही आहे, आजची तरुणाई आपला अधिकाधिक वेळ सोशल मीडियावर व्यतीत क र त असते. सोशल मीडियामुळे जग जवळ आले असले, जगाच्या कानाकोपऱ्यात काय घडते आहे याची माहिती एका क्लिकवर मिळत असली, तरी सोशल मीडियाचे तोटेही तितकेच आहेत हे नाकारून चालणार नाही. सोशल मीडियावर वावरताना अनेक जण आपली वैयक्तिक माहिती उघड करतात. आपली छायाचित्रे, आपले सहलीचे प्लान्स, दैनंदिन जीवनातील घटना, कौटुंबिक आनंदाचे-दुःखाचे क्षण, आपली मानसिक स्थिती जाहीरपणे या माध्यमांवर प्रकट करत असतात. या सर्वांवर बारीक लक्ष ठेवून सावज हेरणारे गुन्हेगारही सोशल मीडियावर वावरत असतात. या सर्वांना महिलावर्ग अधिक प्रमाणात बळी पडतो. सोशल मीडियावर टाकलेल्या माहितीच्या आधारे तरुणींशी जवळीक साधली जाते, त्यांचा विश्वास संपादन केला जातो आणि योग्य संधी मिळताच त्यांना सावज बनवले जाते. बंगालच्या मुख्यमंत्री एक महिला आहेत त्यामुळे महिलांच्या सुरक्षेबाबत त्यांनी विशेष लक्ष देण्याची गरज असताना दुर्दैवाने एकट्या बंगालमध्ये फेसबुकच्या माध्यमातून अपहरण झालेल्या मुलींची संख्या एक लाखाच्या जवळ आहे. फेसबुकप्रमाणे सोशल मीडियाचे अन्य प्लॅटफॉर्म्र्ससुद्धा आहेत. या माध्यमांतूनसुद्धा तरुणींना जाळ्यात ओढून त्यांची फसगत झाल्याच्या घटना याआधी घडल्या आहेत. अन्य राज्यांतसुद्धा अशा प्रकारच्या घटना घडल्या असतील तर त्या उघड करून तरुणाईला सोशल मिडियातील धोक्यांपासून सावध करणे गरजेचे आहे !

**- जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क - ९६६४५५९७८०**

## कुंडलवाडी शहरात स्वतंत्र तलाठी भवन व्हावे, ही नागरिकांची मागणी

**अक्षराज : दत्ता हमंद**
**दि.२९, कुंडलवाडी (नांदेड) :** कुंडलवाडी शहरात नगरपालिका स्थित असून अद्यापही स्वतंत्र तलाठी भवन नसल्यामुळे नागरिकांचे हाल होत आहे. परिणामी कधी तलाठी भवनासाठी भाडी तत्वावर जागा भेटते तर,कधी भाडेतत्त्वावर जागा भेटत नाही, यामुळे स्वतंत्र कार्यालय स्थापन व्हावे ही नागरिकांची मागणी आहे. कुंडलवाडी शहरात नवीन पोलीस स्टेशनचे बांधकाम झाले असून तिथे पोलीस



स्टेशन कार्यरत होऊन जवळपास पाच वर्ष पूर्ण होत आहे तरीही जुन्या पोलीस स्टेशनच्या इमारतीच्या जागी स्वतंत्र तलाठी भवन स्थापन व्हावे ही मागणी अनेक नगरसेवकांनी अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनी तसेच जनतेने सुद्धा केली आहे. जर या ठिकाणी तलाठी भवन झाले तर, नागरिकांना याचा खूप फायदा होईल. कारण ही जागा गावाच्या मध्यभागी असून येजा करण्यास अत्यंत सुखकर आहे. तरी माननीय जिल्हाधिकारी साहेब यांनी याकडे लक्ष देऊन ही जागा तलाठी भवन कार्यालयासाठी सुरू करावी, यामुळे शासनाचा सुद्धा वार्षिक घर भत्ता वाचेल परिणामी महसूल वाढेल ही मागणी सर्व शेतकरी, नागरिक तसेच तरुण सर्व वर्गातून होत आहे.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायलयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात

### खापरखेडा औष्णिक वीज केंद्राच्या मुख्य अभियंता पदी गिरीश कुमरवार यांची निवड



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२९, नागपूर :** नागपूर जिल्ह्याच्या सावनेर तालुक्यातील खापरखेडा येथील औष्णिक वीज केंद्राचे अतिरिक्त मुख्य अभियंता विलास मोटघटे यांच्या जागी महानिर्मितीच्या मुंबई येथील कार्यालयातील गिरीश कुमरवार यांची खापरखेडा औष्णिक वीज केंद्राच्या मुख्य अभियंता पदी निवड करण्यात आली आहे. गिरीश कुमरवार यांनी याआधी खापरखेडा औष्णिक वीज केंद्रात उपमुख्य अभियंता म्हणून कार्य केलेले आहे.

### प्रा.रवींद्र काळाने यांना डॉक्टरेट



**अक्षराज : रोहन रंधवे**

**दि.२९, श्रीगोंदा :** काष्टी येथील परिक्रमा इंजिनिअरिंग कॉलेजचे शारीरिक शिक्षण संचालक प्रा.रवींद्र काळाने यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड मध्ये शारीरिक शिक्षण(महाराष्ट्रातील शालेय स्तरावरील बेसबॉल खेळाडूंच्या मूल्यमापनासाठी कसोटीचे विकसन व प्रामाणिकरण करणे) या विषयात डॉक्टरेट ही पदवी मिळाली. त्यांना यासाठी डॉ. नल्ला भास्कर रेड्डी यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री आमदार बबनराव पाचपुते, परिक्रमा शैक्षणिक संकुलाच्या अध्यक्षा डॉ.प्रतिभा पाचपुते, सचिव विक्रमसिंह पाचपुते, मुख्य कार्यकारी अधिकारी ॲड.प्रतापसिंह बबनरावजी पाचपुते, अतिरिक्त कार्यकारी अधिकारी व मुख्य प्रशासकीय अधिकारी प्रा.अनिल पुंड, अकॅडमी डायरेक्टर इंद्रायणी पाचपुते, अकॅडमी डे.डायरेक्टर प्रा.डॉ.संजीव कदम पाटील, प्र.प्राचार्यमोहन धगाटे, प्राचार्य डॉ.सुनील निर्मळ, प्रा.डॉ.सुदर्शन गिरमकर, प्राचार्य डॉ. रमेश शिंदे, प्राचार्य डॉ.पांडुरंग इथापे, प्राचार्य.डॉ.प्रशांत सूर्यवंशी यांनी अभिनंदन केले.

### मान्सूनपूर्व पावसाने मांजरा धरणाचा पाणीसाठा २.१४४ दलघमी ने वाढला



**अक्षराज : शिवाजी औसेकर**

**दि.२९, केज (बीड) :** लातूर शहरासह अंबाजोगाई, केज, कळंब, धारूर या मोठ्या शहरांसह शेकडो गावची तहान भागवणारे व पाच तालुक्यातील शेतकऱ्यासाठी वरदान असणाऱ्या केज तालुक्यातील मांजरा प्रकल्पातील पाणीसाठ्यात मागील पाच-सहा दिवसात झालेल्या मान्सूनपूर्व पावसाने २.१४४ दलघीमी एवढी वाढ झाली आहे . प्रकल्प पूर्ण झाल्यापासून प्रथमच मे महिन्यात पाण्याचा पहिला येवा नोंदला गेला आहे.सद्यस्थितीत धरणातील मृतसाठा वगळता दि २६ मे रोजी ३५.१६७ दलघमी एवढा उपयुक्त पाणीसाठा आहे.

मांजरा धारणाची एकूण संचयी पाणीपातळी ६४२.३७ मिटर आहे. दि २२ मे रोजी ६३७.५८ होती. मागील पाच सहा दिवसांत झालेल्या मान्सूनपूर्व पावसाने धरणात पाण्याची आवक झाल्यामुळे ११ सेंटीमीटर पाणी पातळीत वाढून होऊन ६३७.६९ पोहचली आहे. धरणाची एकुण साठवण क्षमता २२४.०९३ दलघमी आहे. २६ मे रोजी धरणातील उपयुक्त पाणीसाठा २.१४४ दलघमी ने वाढून ३५.१६७ दलघमी एवढा झाला आहे. त्याची टक्केवारी १९.८७ इतकी आहे. गेल्या पाच-सहा दिवसापासून मांजरा धरण क्षेत्रात मान्सूनपूर्व पावसाने सातत्याने हलक्या ते मध्यम स्वरूपात हजेरी लावली आहे. त्याचा परिणाम, पाणी साठ्यातील वाढीवर झाला आहे. त्यामुळे धरणाच्या ४४ वर्षातील इतिहासात मे महिन्यात पहिल्यांदा पाण्याची आवक नोंदली गेली आहे.

### अभिजीतने पळसपूरचे नाव देशपातळीवर नेले : आ. काशिनाथ दाते



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२९, पारनेर (अहिल्यानगर) :** पळसपुरच्या मातीत जन्माला आलेल्या अभिजीत सहदेव आहेर या हिऱ्याने गावाचे नाव थेट देशपातळीवर नेऊन आपल्या तालुक्याचे नाव उज्वल केले आहे. आजोबा कोंडीभाऊ आहेर हे गावातील पहिले प्राथमिक शिक्षक तर आई- वडिल प्राध्यापक. चांगल्या सुसंस्कृत घरात चांगले संस्कार मिळाले. उच्च शिक्षण घेतल्यानंतर प्राध्यापक म्हणून काम करत असताना व चांगल्या पगाराची नोकरी असताना प्रबळ इच्छाशक्तीच्या जोरावर अभिजीतने चांगले यश संपादन केले. आयआरएस, आयआयबी आणि आयएफएस अशा तीन सलग परीक्षांमध्ये यश संपादन करताना अभिजीत याला त्याच्या बहिणीची म्हणजेच श्रद्धा हिचं पाठबळ प्रोत्साहन देत गेले. त्यातूनच त्याने आई वडिलांसह आपल्या गावचे, मातीचे आणि तालुक्याचा झेंडा देशपातळीवर फडकवला असल्याचे प्रतिपादन आमदार काशिनाथ दाते यांनी केले.

पळसपुर गावचे सुपुत्र कु. अभिजित सहदेव आहेर यांनी केंद्रिय लोकसेवा आयोगाच्या युपीएससी परिक्षेत भारतीय वनसेवा (आयएफएस ११४), भारतीय महसुल सेवा (आयआरएस ७३४), भारतीय गुत्पचर विभाग (इंटीलीजन्स ब्युरो, आयबी) या तीन प्रतिष्ठित शासकीय परीक्षांमध्ये यश मिळविल्याबद्दल त्यांचा जंगी सत्कार करण्यात आला. यश संपादन केलेल्या अभिजीत आहेर याचा त्याच्या गावच्या मातीत गावकऱ्यांनी नागरी सत्कार केला. या सत्कार कार्यक्रमाच्या आधी त्याची गावातून जंगी मिरवणूक काढण्यात आली. यावेळी पोलीस उपअधीक्षक संपतराव भोसले, जिल्हा मराठा शिक्षण संस्थेचे विश्वस्त सिताराम अण्णा खिलारी, भाजप प्रदेश कमिटिचे सदस्य विश्वनाथ दादा कोरडे, वसंतराव चेडे, सुभाषराव दुधाडे, शिक्षक नेते रावसाहेब रोहोकले यांच्यासह पळसपूर येथिल ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी भाऊसाहेब आहेर, संजय धनवान आहेर, बाळासाहेब आहेर, बाबू आहेर, सतिश आहेर, मयुर शिंदे, किसन आहेर, दिलिप आहेर, दिलिप काकडे, संपत आहेर, रामभाऊ ढोल, गणेश आहेर, बाबाजी आहेर, भाऊसाहेब इंजिनिअर, श्रीकांत वाघमारे, सुरेश आहेर यांनी अथक प्रयत्न करून कार्यक्रम यशस्वी केला.

## दौंड-इंदोर एक्सप्रेसला अहिल्यादेवी होळकरांचे नाव द्या : खा.बजरंग सोनवणे




**अक्षराज : शिवाजी औसेकर**

**दि.२९, केज (बीड) :** दौंड-इंदोर एक्सप्रेस गाडीला 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर एक्सप्रेस' असे नाव देण्यात यावे, तसेच या गाडीचा विस्तार अहिल्यानगर (अहमदनगर) पर्यंत करावा, अशी मागणी बीडचे खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे योगदान महाराष्ट्र व मध्यप्रदेशासाठी अतुलनिय आहे. त्यांच्या स्मृतीस आदरांजली ठरावी आणि या भागातील प्रवाशांना अधिक सोयीचा रेल्वेमार्ग उपलब्ध व्हावा, हा यामागचा उद्देश आहे. केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे, दौंड-इंदोर या रेल्वेगाडीस पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर एक्सप्रेस असे नाव देण्यात यावे, अहिल्यादेवी होळकर यांचे योगदान महाराष्ट्रासह मध्यप्रदेशसह अनेक राज्यात महत्वपूर्ण आहे. सदरील गाडीला अहिल्यादेवी यांचे नाव दिल्यास सदरील रेल्वेला नवी ओळख मिळेल. सदरील गाडी आता इंदोर ते दौंड अशी चालत आहे. सदरील गाडीचा विस्तार करून अहिल्यानगरपर्यंत करणे आवश्यक आहे. तसे झाल्यास मराठवाड्यातील यात्रेकरू भाविकांना याचा लाभ होईल. पूण्यश्लोक आहिल्सादेवींचे जन्मस्थान आहिल्यानगर जिल्ह्यात आहे. मराठवाड्यातील नागरिकांना थेट इंदोरला जाणे सोपे होईल. सदरील सेवा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जन्म जयंती ३१ मे रोजी येत असल्याने ३० मे २०२५ पासूनच सुरू करावी, यामुळे जन्मदिनानिमीत्त हा सन्मान ठरेल, असेही पत्रात म्हटले आहे.

## २३ वर्षांनी भेटलेल्या मित्र - मैत्रिणीचे डोळे पाणावले...

### स्नेह संमेलनातून माजी विद्यार्थ्यांनी दिला आठवणींचा उजाळा...





**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२९, तुळजापूर :** मित्र म्हटले कि गप्पा आणि शाळेतील बालपणीचे मित्र म्हटले कि आठवणींना उजाळा. अशाच प्रकारे तुळजापूर तालुक्यातील जवाहर कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय माझी विद्यार्थ्यांनी एकत्र येत आपल्या शालेय जीवनातील आठवणींना उजाळा दिला आहे. यावेळी अनेकांचे डोळे पाणावले होते. तर विद्यार्थी आणि शिक्षक यांनी एकमेकांशी संवाद साधत शाळेतील जुन्या आठवणींना उजाळा दिला.शाळेतील आठवणी नेहमीच हव्याहाव्याशा वाटतात. मात्र शिक्षणाचे पुरेसे धडे घेतल्यानंतर प्रत्येक विद्यार्थी आपल्या कामाधंद्यामध्ये व्यस्त होतो. नवनवीन मित्र-मैत्रिणी आयुष्यात येत असतात. मात्र शाळेतील मित्र आणि त्याच्या सोबतचे क्षण हे विसरता येत नाहीत. नेहमीच आपण आपल्या शाळेतील आठवणी एकमेकांशी शेअर करत असतो. अशाच शालेय मित्रांनी एकत्र येऊन, स्नेहसंमेलन साजरे करून आपल्या शाळेतील जुन्या आठवणींना उजाळा देण्याची कल्पना किती सुंदर असते हे तुळजापूर मधील जवाहर हायस्कुलमध्ये पहायला मिळाले आहे.

तब्बल २३ वर्षांनी भरली शाळा जवाहर कला विज्ञान वाणिज्य महाविद्यालयाच्या २००२ च्या कला शाखेचे दिनांक २५ मे २०२५ रोजी एकता मंगल कार्यालय ईटकळ येथे स्नेह मेळावा भरविण्यात आला. सुरुवातीला सर्व मित्र मैत्रिणी एकत्र जमा झाली एकमेकांना पाहून आनंदाला पारावर उठला नाही. कोणी ओळखायला येत होते तर कोणी अंदाजे ओळखत होते. चेष्टा मस्करी हसी मजा एकमेकांचे सुखदुःख व्यवसाय लेकर बाळ याविषयी चर्चा गप्पा झाल्या.

शिक्षक मंडळी आल्यानंतर अतिशय आदर युक्त फुलांचा वर्षाव करून त्यांचे स्वागत करण्यात आले कार्यक्रमाच्या सुरुवातीला देवी सरस्वती. स्त्री शिक्षणाचा पाया रोवणाऱ्या सावित्रीबाई फुले, शिक्षण महर्षी स्वर्गीय सी.ना.आलुरे गुरुजी, स्वर्गीय प्राध्यापक आप्पाराव शरणाप्पा बेळे गुरुजी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले त्यानंतर एक गुपित म्हणजेच सरप्राईज देण्यासाठी फ्लेक्स चे फित कापून उद्घाटन करण्यात आले. ज्यावर सर्व मित्र-मैत्रिणींचे कॉलेजच्या काळातील फोटो होते. हे संग्रहित करून सर्वांनी पहावे हा उद्देश होता प्रत्येकजण डोळे मोठे करून आपण कुठे आहोत हे शोधत होते. कबाडे सर स्वामी सर गायकवाड सर यांचा सन्मान चिन्ह शाल श्रीफळ फेटा देऊन सत्कार करण्यात आला.

विद्यार्थ्यांचे प्रतिनिधी म्हणून साधना जवळगे नंदिनी दळवी, विजय घोडके व ज्ञानेश्वर घुगे यांना विचार मंचावर बोलवण्यात आले. स्वतःची किडनी भावाला देऊन भावाचे प्राण वाचवणाऱ्या नंदिनी दळवी यांचा सर्व विद्यार्थ्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बळीराम जेठे यांनी केले. कार्यक्रमाची प्रस्तावना ज्ञानेश्वर घुगे यांनी मांडली एकत्र का जमत आहोत आणि २३ वर्षांनंतरच्या इतक्या मोठ्या काळात आपण आपली नाती दृढ करण्यासाठी एकत्र यायला हवं असे प्रास्ताविकात म्हणाले. त्यानंतर विद्यार्थ्यांची ओळख व मनोगत झाले.

सर्व विद्यार्थ्यांनी कॉलेजच्या आठवणींना उजाळा दिला. यामध्ये स्वतःची ओळख सांगत असताना कोणी व्यापार शेती राजकारण सांस्कृतिक नोकरी अशा विविध क्षेत्रांमध्ये काम करत असल्याचे दिसून आले. मनोगत व्यक्त करत असताना राम नाईक यांनी स्वर्गीय बेळे गुरुजींच्या मुळे त्यांनी व्यवसायात कशी उडी टाकली व प्रेरणा कशी मिळाली ही मांडणी केली.

मल्लिनाथ खजूरगे यांनी कॉलेजच्या आठवणी बरोबरच आपण सर्व विद्यार्थ्यांनी पुढील काळात आपल्यावर येणाऱ्या काही अडचणी कशा मात करायच्या व त्याचे कसे नियोजन करायचे याचा विचार मंडला. बळीराम जेठे यांनी मनोगत व्यक्त करत असताना कॉलेजमधल्या काही गमती जमती रुसवे फुगवे भांडण आधी विषयावर उजाळा दिला त्याचबरोबर सध्या स्थितीत असलेले विषमता स्त्री-पुरुष समानता कौटुंबिक हिंसाचार व जागतिक बाजारपेठ याविषयी सखोल मांडणी केली .

लिंबाबाई मुडके यांनी सामाजिक बांधिलकी व एकात्मता याविषयी मनोगत व्यक्त केले. मुलींनी मांडणी करत असताना भावुक झाल्या कारण खूप वर्षानंतर असा आनंददायी प्रसंग आला होता. शिक्षक मंडळी मार्गदर्शन करत असताना कबाडे सरांनी तब्येतीच्या कारणास्तव मुलांना शुभेच्छा व आशीर्वाद दिला. गायकवाड सरांनी मार्गदर्शन करत असताना आपली मुलं आज मोठमोठ्या पदावर काम करत असून आपापल्या ठिकाणी सुखी असल्याचा आनंद व्यक्त केला. त्याचबरोबर स्वर्गीय बेळे गुरुजींच्या आठवणी त्यांच्यासोबत सहकारी म्हणून केलेलं काम यावर प्रकाश टाकला.

## गंजाड अनुदानित आश्रम शाळेतील विद्यार्थी प्रकल्पात प्रथम...



**अक्षराज : निलेश कासट**

**दि.२९, डहाणू (पालघर) :** एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अंतर्गत शासकिय व अनुदानित आश्रम शाळेतील शैक्षणिक वर्ष सन २०२४-२५ या वर्षातील इयत्ता १० वी मध्ये प्रकल्पामध्ये मुलांमध्ये प्रथम, द्वतिय, तृतिय आलेल्या विद्यार्थांच्या त्यांच्या

राहत्या घरी जाऊन प्रकल्प अधिकारी तथा सहाय्यक जिल्हाधिकारी विशाल खत्री (भा.प्र.से.) यांच्या मार्गदर्शना खाली प्रकल्प कार्यालयातील विस्तार अधिकारी अरुण शेटे यांनी विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन पालकांसह त्यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी आदिवासी विकास प्रकल्प कार्यलय डहाणू अंतर्गत येणाऱ्या शिक्षण प्रसारक मंडळाचे अनुदानित आश्रम शाळा गंजाड येथील दहावी मध्ये शिकणाऱ्या रोशन नरेश हाडळ ह्या विदयार्थ्यांने संपूर्ण प्रकल्पातून ९२% मिळवत प्रथम येण्याचा मान मिळाला आहे. रोशन ची घरची परिस्थिती अतिशय हलाखीची व बिकट असून प्रतिकूल स्थितीत रोशन ने यश मिळवले आहेत. तर याच शाळेत शिकणाऱ्या मनोज सुनील लाखात हा प्रकल्पात दुसरा आला आहे.

या विद्यार्थ्यांनी परीक्षेत घवघवीत यश संपादन करून शाळेचे नाव उंचावले आहे. यासाठी प्रकल्प कार्यालयातील विस्तार अधिकारी अरुण शेटे व शाळेचे मुख्याध्यापक सुहास पारधी यांनी रोशन यांच्या घरी जाऊन पुष्पगुच्छ व पुस्तक देऊन त्यांचा सन्मान केला.तसेच मुलांना पुढील शिक्षणासाठी मार्गदर्शन केले.

## कोव्हीडच्या पार्श्वभूमीवर महापालिका सज्ज तिन्ही रूग्णालयात राखीव बेड्सची व्यवस्था

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२९, नवी मुंबई :** सद्यस्थितीत महाराष्ट्र राज्यामध्ये कोव्हीड- १९ संसर्गीत रुग्ण आढळून येत आहेत. त्या अनुषंगाने नवी मुंबई महानगर पालिका कार्यक्षेत्रामध्ये कोव्हीड-१९ पूर्वतयारीच्या दृष्टीने महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. प्रशांत जवादे आणि इतर वैद्यकीय अधिकारी यांची एकत्रित बैठक घेऊन कोव्हीड-१९ संसर्गाच्या अनुषंगाने पूर्वतयारी करण्याच्या व सज्ज राहण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.

त्यामध्ये कोव्हीड- १९ चाचणी आरएटी, आरटी- पीसीआर करणे, पुरेशा प्रमाणात औषधे, सर्जिकल साहित्य, पीपीई किट, ऑक्सिजन, ऑक्सिजन बेड्स उपलब्ध करून घेणेच्या दृष्टीने कार्यवाही करणे, रुग्णालय स्तरावर आवश्यक कक्ष स्थापन करणे, बेड्स उपलब्ध करून देणे अशी अनुषांगिक पूर्वतयारी तातडीने करून घेण्याचे निर्देश दिलेले आहेत. त्याचप्रमाणे सर्व वैद्यकीय व निमवैद्यकीय अधिकारी- कर्मचारी यांना तत्पर राहणेबाबत निर्देशित करून त्याबाबतची जबाबदारी सर्व संबधितांस देण्यात याव्यात असे सूचित केले आहे. कोव्हिड- १९ च्या अनुषंगाने आवश्यक खबरदारी घेणेबाबत नागरिकांमध्येही विविध माध्यमांतून जागरूकता निर्माण करण्याची कार्यवाही करण्याचेही आयुक्तांनी निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार आरोग्य विभागाने तत्पर कार्यवाहीस सुरूवात केलेली आहे.

महापालिकेच्या वतीने कोव्हिडबाबत आवश्यक दक्षता घेण्यात आली असून नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता व्यक्तिगत स्वच्छतेविषयी काळजी घ्यावी व नाहक भीतीचे वातावरण पसरवू नये. मात्र सर्दी, खोकला, फ्लू सदृश्य लक्षणे आढळल्यास वैयक्तिक स्वच्छतेवर भर द्यावा तसेच वैद्यकीय सल्ला घ्यावा आणि आपल्या नजिकच्या नमुंमपा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रात अथवा रुग्णालयात जाऊन उपचार घ्यावेत असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी केले आहे.

# टाकळीढोकेश्वर येथील महावितरण कार्यालयाला अभियंता द्या - बाळासाहेब खिलारी

## विज वितरण कार्यालयात अधिकारीच नाही

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२९, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील टाकळीढोकेश्वर येथील वीज वितरण कंपनीचा कार्यभार प्रभारीच्या भरवशावर सुरू असल्याने नागरिकांना अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे. यामुळे येथे नियमित अभियंता देण्याची निलेश लंके प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळासाहेब खिलारी व टाकळी ढोकेश्वर येथील ग्रामस्थांची मागणी केली आहे. पारनेर तालुक्यातील मोठे व महत्त्वाचे गाव असलेल्या टाकळी ढोकेश्वर गावात महावितरणचे कनिष्ठ अभियंता कार्यालय असून येथे कनिष्ठ अभियंता म्हणून बरेच वर्षे निलेश ओहळ हे कार्यरत होते. सर्व सुरळीत सुरू असताना त्यांची बदली करण्यात आली. त्यांच्या जागेवर प्रभारी अभियंता अजय बासनिवाल यांना पाठविण्यात आले. तेव्हापासून म्हणजेच जवळपास एक वर्षांपासून येथील पद रिक्त असल्याने नागरिकांना विविध प्रकारच्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

टाकळी ढोकेश्वर येथील महावितरणचे कनिष्ठ अभियंता कार्यालय अंतर्गत तसेच या उर्जा केंद्रातून खडकवाडी, वडगाव सावताळ, वनकुटे, मांडवे खुर्द, पळसपूर, देसवडे, वारणवाडी, वासुंदे , ढोकी, धोत्रे,कर्जुलेहर्या इत्यादी जवळपास १८ गावांचा समावेश असून या गावांना विज पुरवठा केला जातो. जवळपास १० हजार घरगुती ग्राहक, २ हजारापेक्षा अधिक कृषी पंपाचे ग्राहक, ३५० व्यापारी ग्राहक व काही औद्योगिक ग्राहक आहेत. याला सांभाळणारे अधिकारी नसल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. टाकळी ढोकेश्वर येथील कनिष्ठ अभियंता पदावर पुन्हा टांगती तलवार निर्माण झाली आहे.

दरम्यान या पदाचा कार्यभार नाशिकचे कनिष्ठ अभियंता बासनिवाल यांच्याकडे देण्यात आल्याचे सांगण्यात आले. त्या हुद्द्यानुसार अधिकारी त्या खुर्चीवर राहिल्यानंतर नागरिकांना तत्पर सेवा मिळू शकते, तसेच निर्णय घेण्याची त्यांच्याकडे क्षमता असल्यामुळे नागरिकांची गैरसोय शक्यतो होत नाही. पण याच अधिकाऱ्याचे पद एक वर्षापासून रिक्त राहत असेल व तेही महावितरण कंपनीच्या कनिष्ठ अभियंत्याचे तर नागरिकांनी त्यांच्या समस्या मांडायच्या कोणाकडे, हा खरा प्रश्न आहे. टाकळी ढोकेश्वर येथील महावितरणचे कनिष्ठ अभियंता बासनिवाल यांच्याकडे प्रभार हा देण्यात तर आला आहे पण ते जेथे म्हणजे पारनेर येथे कार्यरत आहेत, तेथे सेवा देणार की, प्रभार जिथला आहे तेथे देणार हा कळीचा मुद्दा आहे.




**वीज वितरण कार्यालयात अधिकारी दाखवा आणि बक्षीस मिळवा**

टाकळी ढोकेश्वर येथील महावितरणच्या कार्यालयात नुकतीच भेट देऊन पाहणी केली असता विज वितरण कार्यालय शुकशुकाट होता. अधिकारी दाखवा आणि बक्षीस मिळवा. अशी म्हणण्याची वेळ नागरिकांवर आली आहे. एक वर्षापासून ग्राहकांच्या तक्रारी सोडविण्यासाठी अधिकारी उपलब्ध होत नसल्याने टाकळी ढोकेश्वर गावच्या देखरेखीसाठी किंवा काही विजेची अडचण असल्यास वायरमन नेमले आहेत. त्यांची संख्या फक्त एक ते दोन असतील तर त्यांचे काय हाल होत असतील याची जाणीव बहुतेक महावितरणला आलेली नसावी. त्यातच या वायरमन पैकी फक्त दोघेच जण विजेच्या खांबावर चढू व उतरू शकतात ही माहिती सर्व ग्रामस्थांना आहे. कर्मचाऱ्यांची संख्या अपुरी आहेच पण त्यातील काही कर्मचारी हे कंत्राटी पद्धतीने आहेत. त्यामुळे उरलेल्या कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण येत आहे.

**- बाळासाहेब खिलारी (अध्यक्ष, खासदार निलेश लंके प्रतिष्ठान)**

या सर्व अडचणींना नागरिक वैतागले असून सर्व गावांमध्ये महावितरण विषयी नाराजी आहे. येथिल अधिकारी कर्मचाऱ्यांच्या बदल्या झाल्या आहेत परंतु त्या ठिकाणी अजूनही दुसऱ्या कर्मचाऱ्यांची नेमणूक झालेली नाही.

# मुर्टी येथील ओढा खोलीकरणामुळे मोठ्या प्रमाणात पाणी साठ्याची वाढ

**अक्षराज : शरद भगत**

**दि.२८, मुर्टी (बारामती) :** मुर्टी गाव तसं कायम दुष्काळी भाग म्हणुनच ओळखलं जाते. या गावामध्ये अनेक लहान मोठे ओढे आहेत. हे सर्व ओढे अगदी गुडगा भर उंचीचे होते. यामुळे पावसाचे येणारे पाणी वाहत जायचे व मुर्टी गावाला ४ महीने पुरेल इतका ही पाणी साठा नसायचा. यामुळे मुर्टी गावात जनावरांचा चारा व पिके यांच्यासाठी पाणीप्रश्न यांचा सामना करावा लागायचा.

गेल्या २ वर्षांपासून मुर्टी येथील ओढा खोलीकरण करण्याचे काम एका सामाजिक संस्थेने सुरु केले. तांबे वस्ती,बेलबाचा मळा, ओव्हाळाचा मळा, अशाईचा मळा, बालगुडे वस्ती, चिरेखाणवाडी अशा विविध वाड्या वस्त्यांवरील ओढा खोली करणाचे काम या सामाजिक संस्थेने हाती घेतले. यामध्ये मुर्टी गावचे सरपंच कोमल जगताप, उपसरपंच किरण जगदाळे तसेच ग्रामपंचायत पदाधिकारी यांनी या ओढा खोलीकरणाचा पाठपुरावा केला. उपसरपंच किरण जगदाळे हे भर उन्हात मशिनला ओढा खोली करणासाठी योग्य मार्गदर्शन करत रहायचे.



काही शेतकऱ्यांनी पहिल्यांदा विरोध देखील केला. परंतु ओढा खोल व रुंद होऊन आपल्याच शेतीला विहीरीला पाणी वाढेल अशी समजूत घातल्या नंतर त्या शेतकऱ्यांनी देखील विरोध करणं टाळलं व ओढा खोली करणास मदत केली. भर उन्हात मी व माझे सहकारी थांबून खोली करणाचे काम करुण घेत होतो. तेच ओढे आज पाण्याने भरुन वाहताना पाहून माझ्या भावना देखील अनावर झाल्या. मला आनंद व्यक्त करण्यासाठी शब्द सापडत नाहीत. ओढा खोली करण करण्यात आलेल्या दोन्ही बाजूच्या किनार्यावर झाडे लावणार आहोत.

**किरण जगदाळे (उपसरपंच, मुर्टी ग्रामपंचायत)**

मे महिन्यात सर्व वाड्या वस्त्यांवरील ओढा खोलीमुळे व अवकाळी पावसामुळे तुडुंब वाहत आहेत. ओढ्या नजीकच्या शेतीला, विहीरीला या खोली करणाचा फायदा होणार असा विश्वास येथील नागरिकांनी केला आहे. मुर्टी हे गाव कायम जिरायत व दुष्काळी गाव म्हणुन ओळखलं जायचं .गावात दुष्काळ कशा मुळे पडत आहे. याचा अभ्यास आम्ही सर्व तरुणांनी केला व यावर उपाय काय ?

या सर्व गोष्टींवर विचार करताना एक गोष्ट आढळून आली ती म्हणजे पाणी साठ्याचा आभाव. मग काही सामाजिक संस्था, कंपन्या काही प्रमाणात मदत करतात का याची चौकशी केली. काही संस्थेची नावे समजल्या नंतर सरपंच कोमल प्रशांत जगताप, सामाजिक कार्यकर्ते हरिदास जगदाळे व मी या संस्थाना आमच्या गावाबद्दल माहीती देत ओढा खोली करण करण्याची विनंती केली.

२ वर्षांपासुन आमच्या गावात मोठ्या प्रमाणात ओढा खोलीकरण व त्या ओढ्यावर जाण्या येण्यासाठी रस्ता देखील करण्यात आला.

# १८ वर्षाखालील कुमार, कुमारी राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पूर्व विभाग सराव शिबिराचे आयोजन

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२९, पुणे :** यशवंत चांदजी सावंत विद्या मंदिर, गाढव नाका भांडुप पश्चिम येथे दिनांक २७ मे ते ३० मे २०२५ या कालावधीत सुरू आहे.

या सराव शिबिरातून मुंबई उपनगर जिल्हा पूर्व विभागाचा संघ निवडला जाणार आहे. सराव शिबिरा दरम्यान मुंबई उपनगर जिल्हा कबड्डी असोसिएशन कार्याध्यक्ष सुधाकर कृष्णा घाग, सेक्रेटरी राजेश पडेलकर यांनी भेट दिली. यशवंत चांदजी सावंत गोविंदा पथकाचे प्रमुख गणेश दुधवडकर यांच्या तर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. खेळाडूंना प्रशिक्षण



देण्यासाठी शिवछत्रपती पुरस्कार विजेती वीणा खवळे, रिबेका सकपाळ (गवारे), राष्ट्रीय प्रशिक्षक राजन अनुभवणे, संदिप चव्हाण, रमेश जावळे, श्रीकांत पिंजारी, श्रीकांत घावरे, सुनिल खोपकर, सतिश चव्हाण, हेमंत तोडणकर, अतिश कदम, पुनित पुजारी हे उपस्थित होते. यशवंत चांदसावंत विद्या मंदिरच्या समाजसेविका क्रिडा प्रेमी नयना शाम तावडे यांच्या मार्गदर्शनाखाली या सराव शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

क्रिडा शिक्षक श्री.मंचेकर यांनी देखील खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. नयनाताई शाम तावडे मॅडम मुंबई उपनगर जिल्हा कबड्डी असोसिएशनला प्रत्येक सराव शिबिरा दरम्यान मैदान उपलब्ध करून देतात वेळोवेळी सहकार्य करतात. मुंबई उपनगर जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या वतीने नयनाताई शाम तावडे यांचे विशेष आभार मानण्यात आले.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे नांदेड विमानतळावर आगमन

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२९, नांदेड :** राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आज सकाळी येथील श्री गुरुगोबिंदसिंघजी नांदेड विमानतळावर आगमन झाले.

यावेळी त्यांच्यासोबत वित्त व नियोजन राज्यमंत्री ॲड आशिष जयस्वाल यांचेही आगमन झाले. जिल्हा प्रशासनाच्यावतीने जिल्हाधिकारी राहुल कर्डीले, जिल्हा परिषदेच्या मुख्य



कार्यकारी अधिकारी मेघना कावली, पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी आमदार आनंदराव तिडके व विविध पदाधिकारी यांची उपस्थिती होती. त्यानंतर परभणी येथील नियोजित कार्यक्रमासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हेलिकॉप्टरने परभणी कडे प्रयाण केले.

# थोडक्यात

## तावशी येथे वाळू माफियांच्या वाहनानी एकास चिरडले



**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.२९, पंढरपूर :** तावशी येथील अहमद हासिम आतार वय वर्षे ६५ हे पहाटे तावशी येथिल नदीच्या रस्त्याने जात असताना नागोबा मंदिराच्या परिसरात एका अवैद्य वाळूच्या वाहनाने धडक दिल्याने त्यांचा मृत्यु झाल्याचे बोलले जात आहे. एका निष्पाप व्यक्तीचा मृत्यू हा वाळू तस्करा च्या वाहनाकडून होणे ही एक दुर्दैवी घटना या परिसरामध्ये घडल्या मुळे तावशी आणि पंचकृषी शितील नागरिका मधुन हळहळ व्यक्त होत आहे. माण नदी परिसरामध्ये बऱ्याच दिवसा पासुन अवैद्य वाळू उपसा केला जातो ह्या बातम्या वर्तमान पत्रामध्ये प्रसिद्ध झाल्या होत्या. परंतु शासकीय कामात व्यस्त असलेले महसुलचे अधिकारी तहसिलदार व प्रान्त यांनी त्यांना वेळीच आवर घातला असता तर आज ही एका गरिब कुंटुंबावर वेळ आली नसतीअवैद्य वाळू तस्करांच्या या वाहतुकीमुळे मॉर्निंग वॉकसाठी जाणाऱ्या लोकांमध्ये भितीचे वातावरण झाले आहे. महसुल प्रशासन सर्व ठिकाणी अवैद्य वाळू उपसा करणाऱ्यावर कारवाई केली जाते. मग तावशी परिसरातील अवैद्य वाळू उपसा करून वाहतुक करणाऱ्या वर कारवाई का केली जात नाही. महसुल अधिकारी आणि त्यांचे कर्मचारी का गप्प? आणि मग कुठेतरी शंकेची पाल चुकचुकली आहे. आणि मग ती वेळ आली की महसुल प्रशासन आता तरी जागे होईल का ? तावशी परिसरामध्ये ही घटना घडली अवैद्य वाळू वाहतुक करणाऱ्या एका निष्पाप बळी घेतला याचा तपास पोलिस अधिकारी करत आहे. पोलिस अधिकाऱ्यांनी स्पॉट पंचनामा व नकाशे घेतले आहे. ज्या वाहनानी या निष्पाप व्यक्तिस चिरडले आहे. त्या वाहन वर कठोर कारवाई करावी व त्यावरील ड्रायव्हर आणि वाहन मालकावर कठोर कारवाई व शिक्षा झाली पाहिजे असे मत संतापजनक जमलेल्या ग्रामस्थाकडून व्यक्त केली जात आहे.

## अहिल्यादेवी होळकरांचे लोककल्याणकारी कार्य सर्व समाजासाठी प्रेरणादायी - इंद्रजित तुडमे



**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.२९, बिलोली (नांदेड) :** शहरात अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंती निमित्त प्रतिमेचे पूजन करुन अभिवादन करण्यात आले. अहिल्यादेवी होळकर या लोककल्याणकारी शासक होत्या. त्यांनी जनतेला केंद्रस्थानी ठेवून राज्यकारभार केला. त्यांच्या कार्याची व्याप्ती ही मर्यादित नव्हती तर संपूर्ण भारतभर त्यांनी जी मंदिरे, घाट, धर्मशाळा, तलाव, पूल, रस्ते, वसाहती बांधल्या त्या वास्तू या आजही त्यांच्या दूरदृष्टीचे आणि लोकसेवेच्या उत्कटतेचा साक्षीदार आहेत. त्यांच्या कामांमध्ये हिंदू धर्माबाबतची अतीव निष्ठा, सामाजिक समरसता, आर्थिक न्याय, पर्यावरणपूरक विचार आणि सार्वजनिक हित या मूल्यांचे स्पष्ट प्रतिबिंब दिसून येते असे मत भारतीय जनता पक्षाचे बिलोली शहर मंडळ अध्यक्ष इंद्रजित तुडमे यानी व्यक्त केले. पुढे ते म्हणाले, आजच्या काळातही प्रशासन, लोकसेवा आणि सार्वजनिक रचना या क्षेत्रात अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य प्रेरणादायी आदर्श ठरते. त्यांच्या कार्याचा आदर्श ठेऊन भारताला आजही एक आदर्श आणि समतोल समाज घडवण्याची प्रेरणा मिळू शकते. धर्मरक्षण आणि धर्मसंवर्धन हीच त्यांच्या कामाची खरी पावती आहे. भारतीय जनता पक्षाने अहिल्याबाई होळकर यांची जयंती मोठ्या हर्षोल्हासाने साजरी करण्याचा निर्णय घेतला आहे तसेच अहिल्यादेवी होळकरांच्या संघर्षांची माहिती पत्रिका प्रकाशित करण्याचाही निर्णय घेतला गेला आहे.

पक्षाने दिलेल्या कार्यक्रमाची अंमलबजावणी होत असून त्याचा आनंद होत आहे. यावेळी प्रामुख्याने देगलूर बिलोली विधानसभा मतदारसंघाचे आमदार जितेश अंतापुरकर, प्रदेश कार्यकारणी सदस्य ऊमाकांत गोपछडे, जिल्हा सरचिटणीस लक्ष्मण ठक्करवाड, हाजप्पा पा.सुंकलोड, माजी नगराध्यक्ष विजयकुमार कुंचनवार, सतिश गौड, शंकरराव काळे, विश्वनाथ समन, राजेंद्र रेड्डी, बिलोली शहर मंडळ अध्यक्ष इंद्रजित तुडमे, बिलोली पूर्व मंडळ अध्यक्ष मारोती राहीरे, पश्चिम मंडळ अध्यक्ष शिवराज बोधने, संजय भोसले, पुरुषोत्तम अब्दागिरे, राजकुमार गादगे, भगवान पा.कानोले, प्रकाश भंडारे, संदीप पाटील, शिवकन्याताई सुरकुटलावार, साईराज रुद्रुरकर, अभिजीत धरमुरे, पिराजी शेळके यांच्यासह भागातील सर्व प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या लाभाकरीता शेतकरी ओळख क्रमांक (फार्मर आयडी) अनिवार्य

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२९, मूल (चंद्रपूर) :** महाराष्ट्र शासन - कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभागाचे दि. १४/१०/२०२४ चे शासन निर्णयान्वये राज्यातील कृषी क्षेत्रात डिजिटल सेवांचा वापर करुन शासनाच्या विविध योजनांचा जलदगतीने व परिणामकारक लाभ शेतकऱ्यांना देण्याच्या उद्दिष्टाने राज्यात ॲग्रिस्टॅक योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत राज्यातील सर्व शेतकऱ्यांचा व त्यांच्या शेतांचा आधार संलग्न माहिती संच तयार करण्यात येऊन शेतकऱ्यांचा आधार क्रमांक हा त्या माहितीशी जोडून प्रत्येक शेतकऱ्याला त्याच्या सर्व शेतासह एकत्रितरित्या शेतकरी ओळख क्रमांक (फार्मर आयडी) देण्यात येत आहे. दि. ११/०४/२०२५ च्या शासन निर्णयान्वये कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या लाभाकरिता शेतकरी ओळख क्रमांक (फार्मर आयडी) दिनांक १५/०४/२०२५ पासून अनिवार्य करण्यात आलेला आहे.

त्यामुळे मूल तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांनी दि. ३१ मे २०२५ पर्यंत आपला शेतकरी ओळख क्रमांक (फार्मर आयडी) सेतू केंद्रातून तयार करुन घेण्याचे आवाहन एस. डी. कारडवार तालुका कृषी अधिकारी मूल यांनी केले आहे. अन्यथा कृषी विभागाच्या विविध योजनांचा लाभ घेता येणार नाही. शेतकरी ओळख क्रमांक (फार्मर आयडी) तयार करण्यासाठी १) सातबारा (सर्व शेतांचे), २) आधार कार्ड, ३) मोबाईल क्रमांक ही कागदपत्रे आवश्यक आहे.